पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०६/२०२०
दिनांक - २१/११/२०२०


प्रति,
मा.................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष मा.महापालिका सभा (विशेष बैठक) दिनांक **०६/११/२०२०** रोजी सकाळी **११.००** वा. आयोजित केलेबाबत...

माननीय महोदय / महोदया,

मा.तुषार रघुनाथ हिंगे यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १९ (४) अन्वये मा.महापौर यांस लेखी सुचना देऊन मा.उपमहापौर पदाचा दिनांक १४ ऑक्टोंबर २०२० रोजी राजीनामा दिलेला आहे. सदरचा राजीनामा मा.महापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.महापौर/ कावि/११४६/२०२०, दि.१४/१०/२०२० अन्वये मंजूर करुन पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी नगरसचिव विभागाकडे पाठविलेला आहे. मा.उपमहापौर या पदाची जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (५) अन्वये भरण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका **(** महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) व (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष मा.महापालिका सभा (विशेष बैठक) शुक्रवार दिनांक **०६/११/२०२०** रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०९ सप्टेंबर २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती**.**

आपला विश्वासू



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

\\Nagersachiv1\Election_2020-21\Mayor_Dymayor\Agenda 01.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

**सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूक घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३(१) व (२) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (एच)(आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ५०**

मा.तुषार रघुनाथ हिंगे यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १९ (४) अन्वये मा.महापौर यांस लेखी सुचना देऊन मा.उपमहापौर पदाचा दिनांक १४ ऑक्टोंबर २०२० रोजी राजीनामा दिलेला आहे. सदरचा राजीनामा मा.महापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.महापौर/ कावि/११४६/२०२०, दि.१४/१०/२०२० अन्वये मंजूर करुन पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी नगरसचिव विभागाकडे पाठविलेला आहे. रिकाम्या होणा-या मा.उपमहापौर या पदाची जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (५) अन्वये भरण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) व (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा (विशेष बैठक) **शुक्रवार** दिनांक **०६/११/२०२०** रोजी सकाळी **११.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित केली आहे. सदर सभेत खालील कामकाज होईल.

- **निवडणूक** -

**विषय क्र.०१)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (५) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे **मा.उपमहापौर** यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे ) नियम २००५ प्रमाणे करणे.

टिप - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम २००५ मधील नियम क्रमांक ५ अन्वये " महापौर अथवा उपमहापौरांची निवड करण्यासाठी बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल,")

**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०६ /२०२०
दिनांक : २१/११/२०२०

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाची कागदपत्रे (डॉकेटस्) मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवणेत आलेली आहेत.